जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 OCT 2025
लोकमत

# डॉ. शिर्केंच्या कौशल्यामुळे शिवाजी विद्यापीठाचा जागतिक लौकिक

## डॉ. माणिकराव साळुंखे : कार्यकाळ समाप्तीनिमित्त झाला सत्कार सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क




शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कार्यकाळ समाप्तीनिमित्त माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

**कोल्हापूर :** उत्तम शिक्षक, संशोधक आणि समाजाभिमुख प्रशासक कसा असावा, याचा वस्तुपाठ म्हणजे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची कारकीर्द आहे. त्यांना जागतिक दर्जाचे शास्त्रज्ञ असलेल्या प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची लाभलेली साथ मौल्यवान आहे. या जोडीने उत्तम प्रशासकीय कौशल्याचे प्रदर्शन घडवीत शिवाजी विद्यापीठाला शैक्षणिक व संशोधकीय दिशा देऊन जागतिक पातळीवर लौकिक प्राप्त करून दिला, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी सोमवारी काढले.

शिवाजी विद्यापीठातील पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करून पदउतार होत असल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनातर्फे कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचा डॉ. साळुंखे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सुमारे पाच तास चाललेल्या या समारंभाला विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांसह समाजातील अनेक मान्यवरांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली.

> डॉ. शिर्के आणि डॉ. पाटील यांनी काम करीत असताना ज्या समन्वयवृत्तीचे आणि समंजसपणाचे दर्शन घडविले.

डॉ. साळुंखे म्हणाले, डॉ. शिर्के आणि डॉ. पाटील यांनी काम करीत असताना ज्या समन्वयवृत्तीचे आणि समंजसपणाचे दर्शन घडविले, ते अतिशय कौतुकास्पद आणि दुर्मीळ आहे. विद्यापीठाप्रती असलेल्या सर्वोच्च निष्ठेमुळेच आपल्या कार्यकाळात त्यांनी उत्कृष्ट सेवा प्रदान केली. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठात आपण विद्यार्थी म्हणून प्रवेशित झाल्यापासून ते आज कुलगुरू म्हणून निवृत्त होण्यापर्यंतच्या आपल्या वाटचालीचा वेध घेतला आणि या दरम्यान विविध टप्प्यांवर आपल्याला सहकार्य आणि मार्गदर्शन करणाऱ्या कुलगुरूंपासून ते अधिकारी, क्लार्क, शिपाई आणि विद्यार्थी या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. माधुरी वाळवेकर यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वागत केले. नंदिनी पाटील आणि धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, डॉ. अजितसिंह जाधव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 OCT 2025
तरुण भारत

# संख्याशास्त्राचे विद्यार्थी म्हणजे तेजस्वी तारे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यास उपस्थित माजी विद्यार्थ्यांना संबोधित करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

प्रतिनिधी
कोल्हापूर

- डॉ.डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन
- संख्याशास्त्र विभागाचा माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे माजी विद्यार्थी हे आपल्या कर्तृत्वाने विविध क्षेत्रांत झळकणारे तेजस्वी तारे आहेत. त्यांचा शिक्षक म्हणून आम्हाला अतिशय अभिमान वाटतो, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज काढले. विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात संबोधित करताना ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन अधिविभागाचे माजी विद्यार्थी तसेच विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी विभागातील सेवानिवृत्त प्राध्यापक तथा कुलगुरू डॉ. शिर्के, डॉ. काशीद आणि डॉ. कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

मेळाव्यात संख्याशास्त्र अधिविभागाचे १९८५ ते २०२५ पर्यंतच्या विविध बॅचमधील सुमारे १४० माजी विद्यार्थी तसेच १०० आजी विद्यार्थी सहभागी झाले.

यावेळी भावी करिअरच्या संधी, सांख्यिकी शिक्षणाची उपयुक्तता आणि उद्योग-जगतातील डेटा सायन्सचे महत्त्व या विषयांवर सखोल चर्चा झाली. माजी विद्यार्थी समन्वयक डॉ. सोमनाथ पवार यांनी स्वागत व परिचयपर भाषण केले. विभागप्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी विभागाचा संक्षिप्त आढावा सादर केला. एस. व्ही. राजगुरू यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सचिन पाटील, प्रा. संजय गांजवे, संजय पाटील, अमोल चव्हाण, यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 OCT 2025
पुढारी

# संशोधनाचा उपयोग ग्रामपंचायत, शाळा, महाविद्यालये, शेतकरी गटांना व्हावा

## डॉ. शिंदे : सारथी उपकेंद्रांतर्गत संशोधक विद्यार्थ्यांची एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संशोधनाचा उपयोग ग्रामपंचायत, शाळा, महाविद्यालये, शेतकरी गट व सामाजिक संस्थांशी संवाद साधत समाजकार्यासाठी व्हावा, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केली.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेच्या वतीने सारथी उपकेंद्र कोल्हापूरच्या वतीने संशोधक विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. 'सारथी'च्या माध्यमातून राबविण्यात



येत असलेल्या छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेतून आतापर्यंत पाच विद्यापीठांतील ४२६ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा लाभ झाला आहे.

संशोधन केवळ मर्यादित न राहता समाजाच्या जीवनमानात परिवर्तन घडवणारे ठरावे, अशी अपेक्षा सारथीच्या सहव्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी यांनी व्यक्त केली. आशिष भुवड, दिग्विजय पाटील, अपूर्वा पाटील, मयुरेश पाटील आणि संदीप माने या पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी त्यांच्या संशोधनावर आधारित सादरीकरण केले. दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी 'संशोधनाची उपयुक्तता व स्टार्टअप' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यकारी अधिकारी डॉ. विलास पाटील, पुणे यांनी प्रास्ताविक केले. संशोधन अधिकारी नयन गुरव यांनी आभार मानले.

0 8 OCT 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन हे समाज जीवनात परिवर्तन घडविणारे असावे

## किरण कुलकर्णी : सारथी उपकेंद्रातर्फे संशोधक विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संशोधकांच्या एकदिवसीय कार्यशाळेत सारथीच्या सहव्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी यांचा सत्कार करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. शेजारी मान्यवर.

कोल्हापूर, ता. ७ : संशोधन हे मर्यादित न राहता समाज जीवनात परिवर्तन घडविणारे असावे, अशी अपेक्षा छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) सहव्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी यांनी आज येथे व्यक्त केली.

सारथी उपकेंद्रातर्फे शिवाजी विद्यापीठातील शाहू सभागृहात संशोधक विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

कुलकर्णी म्हणाल्या, 'सारथीच्या माध्यमातून मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी गटातील होतकरू विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत. सारथीच्या माध्यमातून २०१९ पासून राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेतून आतापर्यंत पाच विद्यापीठांमधील ४२६ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा लाभ झाला आहे. विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांची सर्वाधिक संख्या ही सारथीसाठी अभिमानाची बाब आहे.'

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी संशोधनाचा थेट उपयोग ग्रामपंचायत, शाळा, महाविद्यालये, शेतकरी गट व सामाजिक संस्थांशी संवाद साधत समाज कार्यासाठी व्हावा, असे सांगितले. यावेळी आशिष भुवड, दिग्विजय पाटील, अपूर्वा पाटील, मयुरेश पाटील, संदीप माने या पीएच. डी. संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधनावर आधारित सादरीकरण केले. दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी 'संशोधनाची उपयुक्तता व स्टार्ट-अप' विषयावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी सहायक लेखाधिकारी अनिस पटेल उपस्थित होते. सारथीचे कार्यकारी अधिकारी डॉ. विलास पाटील यांनी प्रास्ताविक केले. संशोधन अधिकारी नयन गुरव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 OCT 2025
पुण्यनगरी

# 'संशोधक विद्यार्थ्यांची एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेच्या माध्यमातून मराठा, कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी या लक्षित गटांतील होतकरू विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी अविरत प्रयत्न केले जात आहेत. त्याच अनुषंगाने सारथी उपकेंद्र कोल्हापूरच्या वतीने संशोधक विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन शाहू सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे करण्यात आले.

'सारथी'च्या माध्यमातून २०१९ पासून राबवण्यात येत असलेल्या छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेतून आतापर्यंत पाच विद्यापीठांतील तब्बल ४२६ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा लाभ झाला आहे. संशोधन केवळ मर्यादित न राहता समाजाच्या जीवनमानात परिवर्तन घडवणारे ठरावे, अशी अपेक्षा 'सारथी'च्या सहव्यवस्थापकीय संचालक श्रीमती किरण कुलकर्णी यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांची सर्वाधिक संख्या ही 'सारथी'च्या अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, संशोधनाचा थेट उपयोग ग्रामपंचायत, शाळा, महाविद्यालये, शेतकरी गट व सामाजिक संस्थांशी संवाद साधत समाजकार्यासाठी व्हावा. आशिष भुवड, दिग्विजय पाटील, अपूर्वा पाटील, मयुरेश पाटील आणि संदीप माने या पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी त्यांच्या संशोधनावर आधारित सादरीकरण केले. त्यानंतर दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी 'संशोधनाची उपयुक्तता व स्टार्टअप' या विषयावर मार्गदर्शन केले.

स्वागत व प्रास्ताविक डॉ. विलास पाटील, कार्यकारी अधिकारी, सारथी पुणे यांनी तर नयन गुरव, संशोधन अधिकारी यांनी आभार मानले. यावेळी अनिस पटेल, सहा लेखाधिकारी, सारथी उपकेंद्र कोल्हापूर, विविध प्राध्यापक, तसेच 'सारथी'चे पीएच. डी. संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 OCT 2025
पुण्यनगरी

# 'पर्यावरणभान व पत्रकारिता' आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ येथे बुधवार, दि. ८ रोजी सकाळी १०.३० वाजता 'पर्यावरणभान आणि पत्रकारिता' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा होणार आहे. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, किर्लोस्कर ऑईल इंजिन्स, लक्ष्मी मल्टिपर्पज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत पुणे येथील ज्येष्ठ पत्रकार अनुप जयपूरकर आणि संदीप चोडणकर उपस्थित असणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे असतील, अशी माहिती समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, किर्लोस्कर ऑईल इंजिन्सचे शरद आजगेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 OCT 2025
तरुण भारत

# 'पर्यावरणभान अन् पत्रकारिता'वर विद्यापीठात आज कार्यशाळा

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठाचे पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, किर्लोस्कर ऑईल इंजिन्स आणि लक्ष्मी मल्टीपर्पज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'पर्यावरणभान आणि पत्रकारिता' विषयावर आज एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत पुणे येथील ज्येष्ठ पत्रकार व पर्यावरणाचे अभ्यासक अनुप जयपूरकर व संदीप चोडणकर उपस्थित असणार आहेत. जयपूरकर पर्यावरण आणि पत्रकारिता या विषयावर तर चोडणकर हे जल साक्षरता या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा सकाळी १०.३० वा. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये होणार आहे. या कार्यशाळेला उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव व किर्लोस्कर ऑईल इंजिन्सचे शरद आजगेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 OCT 2025
पुण्यनगरी

# अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त ग्रंथ प्रदर्शन

**कोल्हापूर :** अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त कोल्हापूर विभागीय आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमध्ये ३ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत लोकराज्य मासिकाचे अंक व दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन नुकतेच शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर, माहिती उपसंचालक प्रवीण टाके, जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ व अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते. हे प्रदर्शन ९ ऑक्टोबरपर्यंत कार्यालयीन वेळेत सुरू राहणार आहे. या प्रदर्शनाला सर्वांनी भेट द्यावी, असे आवाहन कोल्हापूर विभागाचे उपसंचालक (माहिती) प्रवीण टाके व जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ यांनी केले आहे.